## मा. श्री. एकनाथराव खडसे, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना.

"नागपूर जिल्हयातील पेंच व्याघ्र प्रकल्प, वर्धा जिल्यातील बोर वन्यजीव अभयारण्य, चंद्रपूर येथील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प या तीन अतिसंरक्षीत क्षेत्रामध्ये संकुलाचे बांधकाम करताना आदिवासी विभागाच्या शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करुन एकाच संस्थेला त्याची कामे देऊन मोठया प्रमाणात आर्थीक भ्रष्टाचार केल्याचे नुकतेच उघडकीस येणे, सदरहू प्रकल्पांची वन खात्यामार्फत सुरु करण्यात आलेली कामे वन क्षेत्रात येत असतानाही वन संवर्धन कायद्यान्वये प्रस्ताव सादर न करता व त्याकरीता केंद्र शासनाची परवानगी देखील न घेता सदरहू तिन्ही ठिकाणी पर्यटकांसाठी पर्यटन संकुल बांधण्यात येणे, आदिवासी विभागाच्या शासन निर्णयानुसार वन संरक्षीत क्षेत्रात बांधकाम करण्यासाठी वनसंरक्षण निवासस्थान, चेकपोस्ट व वायरलेस स्टेशन या व्यतिरिक्त इतर बांधकामे करण्यास निर्बंध असतानाही त्या शासन निर्णयाचे उल्लंघन करण्यात येणे, सदरहू शासन निर्णय हा आदिवासींकरीता स्वस्त दरात घरे बांधण्याबाबतचा असताना वन विभागाने त्याचे उल्लंघन करुन पर्यटक संकुलाचे बांधकाम करणे, सदरहू तीन्ही ठिकाणांची बांधकामे करण्यासाठी वर्धा येथील ग्रामपयोगी विज्ञान केंद्र, दत्तपूर या संस्थेकडेच देण्यात येणे, त्याकरीता निविदा न मागविता केवळ १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर करार करुन देण्यात आल्यामुळे त्या कराराबाबत देखील निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, हे सर्व प्रकल्प मुख्य वनसंरक्षक डॉ. नंदकिशोर यांच्या कार्यक्षेत्रात व मार्गदर्शनाखाली करण्यात आल्याचा व्यक्त होत असलेला आरोप, परिणामी या सर्व गैरव्यवहाराची व भ्रष्टाचाराची चौकशी करुन त्यातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई."

---

## निवेदन

नागपूर जिल्हयातील पेंच व्याघ्र प्रकल्प, वर्धा जिल्हयातील बोर अभयारण्य व चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प या क्षेत्रात निसर्ग-पर्यटन योजनेअंतर्गत निसर्ग निर्वचन केंद्र व निवासी सुविधांचे बांधकाम करण्यात आलेले आहे. सदर बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र, दत्तपूर, वर्धा या संस्थेमार्फत करण्यात आलेले आहे.

ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र, दत्तपूर ही नोंदणीकृत धर्मादाय संस्था असून कंत्राटदार नाही. ही संस्था मातीच्या न भाजलेल्या विटा व देशी कवेलूंचा वापर (Mud block & Country Tiles arch) हे वैशिष्ट पूर्ण तंत्रज्ञान वापरुन गैर व्यावसायीक पध्दतीने कमी किंमतीची निसर्गाशी समरुप (eco-friendly) घरे तयार करीत आहे व अशाप्रकारे काम करणारी ती देशात अग्रणी संस्था गणली जाते. ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र, दत्तपूर, वर्धा ही संस्था हुडको (भारत सरकारचा उपक्रम) या संस्थेची सहयोगी संस्था म्हणून कार्यरत असून हुडको व्दारे मान्यताप्राप्त आहे. या संस्थेने सिडको, जिल्हा परिषद, आदिवासी विभाग ईत्यादी महाराष्ट्र शासनाचे विभागात अनेक इमारतींचे बांधकाम केलेले आहे.

तसेच इतर राज्य शासन व केंद्र शासनाच्या विविध विभागातील इमारतींचे बांधकाम केलेले आहे. अशी विशिष्ठ प्रकारची कामे करणारी इतर यंत्रणा नसल्यामुळे त्या कामासाठी निविदा मागविण्यात आली नाही व जिल्हापरिषद, सिडको व इतर विभागांनी केलेल्या MOU (करार) प्रमाणे त्यांचेशी MOU (करार) करुन त्यांना कामे देण्यात आलेली आहेत.

सदर संस्था निसर्गाशी समरुप (eco-friendly) व हुडको यांचे माहिती पुस्तीकेत नमूद केल्यानुसार प्रचलीत दरापेक्षा स्वस्त दरात बांधकाम करीत असल्यामुळे त्यांचेकडून सदर बांधकामे करण्यात आलेली आहे. सदर कामे योग्यरित्या पूर्ण करण्यात आली आहे त्यात कोणताही भ्रष्टाचार झालेला नाही.

सदर बांधकामे संबंधीत तीन्ही संरक्षीत क्षेत्राच्या व्यवस्थापन आराखड्यात नमूद निसर्ग पर्यटनाचा एक भाग म्हणून घेण्यात आली आहे. सदर बांधकामे वन / वन्यजीव व्यवस्थापनाच्या दृष्टीने आवश्यक असल्यामुळे करण्यात आले असून त्याकरीता वनसंवर्धन कायद्याच्या तरतुदी आकृष्ट होत नाहीत अशी धारणा आहे. त्याचप्रमाणे वन्यजीव (संवर्धन) अधिनियम १९७२ चे कलम ३३ व कलम ३५(८) अन्वये मुख्य वन्यजीव रक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना वैधानीक अधिकार असल्याने ते वन्यजीव व्यवस्थापनाच्या हिताच्या दृष्टीकोनातून आवश्यक बाबींबाबत उपाययोजना करण्याकरीता प्राधिकृत आहेत.

सदर कामे केंद्र शासनाने मंजूर केलेल्या वन्यजीव कार्य आराखडा २००२-२०१६ मध्ये दिलेल्या तत्त्वांशी समरुप आहेत.

आदिवासी विभागाच्या दिनांक ३०.७.२००८ च्या शासन निर्णयात सेंटर ऑफ सायन्स फॉर व्हिलेजेस, दत्तपूर, वर्धा या संस्थेस सुध्दा ज्या जिल्हयामध्ये ते काम करण्यास इच्छुक आहे त्या जिल्हयामध्ये बांधकाम देण्याबाबत तरतुद आहे. सदर शासन निर्णयात वन संरक्षीत क्षेत्रात बांधकाम घेण्याचे निर्बंधाबाबत नमूद नाही. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे या संस्थेकडून बांधकाम करण्यात आले असून त्यामुळे या प्रकरणात आदिवासी विभागाच्या शासन निर्णयाचा भंग झालेला नाही.

पेंच व्याघ्र प्रकल्प, वर्धा जिल्हयातील बोर अभयारण्य व चंद्रपूर जिल्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प येथील बांधकामे ग्रामोपयोगी विज्ञान केन्द्र, दत्तपूर वर्धा यांना देण्याबाबत तत्कालीन मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर डॉ. नंदकिशोर यांनी सुचना दिल्या नाहीत असे अभिलेखावरुन दिसते. तथापि या संस्थेकडून काम करणे बाबत तत्कालीन वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, पेंच व ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांनी आपले स्तरावरुन करार (MOU) केला होता.

वरील विवेचनावरुन असे दिसून येईल की, सदर कामे वन्यजीव व्यवस्थानाच्या आवश्यकते प्रमाणे करण्यात आली असून त्यात भ्रष्टाचार किंवा आदिवासी विभागाचे शासन निर्णयाचा भंग झालेला नाही. तसेच वरील कामे वन्यजीव व्यवस्थापनाचा एक भाग म्हणून घेण्यात आले असल्याने कोणावरही कारवाई करणे योग्य ठरणार नाही.